# गायीमधील माजाचे निदान : महत्व व पध्दती

**डॉ. चैतन्य पावशे**

पशुजनन, मादीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग

स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशु विज्ञान संस्था, अकोला.

गायीमधील माजाचे निदान करणे हे अत्यंत महत्वाचे आहे. कारण माजाचे निदान योग्य वेळेत झाल्यास कृत्रिम रेतन ही योग्य वेळेत केले जाते. यामुळे गर्भधारणेचे प्रमाण वाढते. बऱ्याचवेळा पशुपालकांचे गायींचा माज ओळखण्यात दुर्लक्ष होते. यामुळे गायीमधील भाकड कालावधी वाढतो, व्यवस्थापणाचा व खाद्याचा खर्चही नाहक वाढत जातो. या सर्व बाबींचा पशुपालकांच्या दुध व्यवसायाच्या अर्थकारणावर विपरीत परिणाम होऊन दुग्ध व्यवसायात नुकसान होऊ शकते. यामुळे पशुपालकांना माजाची लक्षणे माहिती असणे गरजेचे आहे. गाय गाभण नसल्यावर दर तीन आठवड्यांनी (२१ दिवस) माजाची लक्षणे दाखवते. माजाचा कालावधी साधारणपणे २० ते २४ तास असतो.



१) गाय माजावर असेल तर सतत हंबरते.

२) योनीमार्गाव्दारे चिकट स्वच्छ पारदर्शक द्रव (सोट) बाहेर येतो.

३) योनी ओठ सुजलेले दिसतात.

४) योनी मार्ग तांबुस व लालसर दिसतो.

५) गाय अस्वस्थ व बैचेन होते.

६) गाय वारंवार थोडी थोडी लघवी करते.

७) गाय कळपात असेलतर माजावर आलेली गाय दुसऱ्या गायीवर उडते व दुसरी गाय त्या गायीवर उडल्यास स्वस्थ उभी राहते.

८) पशुपालकांनी शक्यतो दिवसातुन चार वेळा प्रत्येकवेळी वीस मिनीटे माज निदानाकरीता गाईचे निरीक्षण करावे म्हणजे गोठ्यातील ९० ते ९५ % गाईमधील माजाचे निदान होईल.

९) गाभण नसलेल्या गाई यांचे बारकाईने निरीक्षण करावे व माज निदान यांची लक्षणे पाहुन अचुक माज निदान करावे.

**माजाचे प्रकार**

साधारणत: माजाचे तीन प्रकार पडतात.

**१) शांत किंवा मुका माज**

माजाची बाह्य लक्षणे ही तीव्र नसतात. यामुळे असा माज शेतकऱ्यांना ओळखणे कठीण जाते.

**२) नियमित माज**

गाय गाभण नसल्यास दर २१ दिवसांनी माजावर येते व बाह्य लक्षणे चांगली दिसतात.

**३) तीव्र माज**

माजाची बाह्य लक्षणे तीव्र स्वरुपात आढळतात. तिव्र माज पशुपालकांना लगेच ओळखता येतो.

विदेशी जातीच्या तसेच संकरीत गाईमध्ये माजाचा कालावधी साधारणपणे वीस ते चोवीस तास असतो. तर देशी गाईमध्ये तो कमी असतो. उन्हाळ्यामध्ये माजाची तीव्रता तसेच कालावधी कमी असतो यामुळे उन्हाळ्यात माजाचे अचुक निदान करणे अवघड जाते.

सकाळी माजावर आलेल्या गाईला संध्याकाळी व संध्याकाळी माजावर आलेल्या गाईला सकाळी कृत्रीम रेतन करावे. सलग तीन वेळा कृत्रीम रेतनानंतर गाय गाभण राहत नसेल तर पशुवैद्यकाकडून तपासणी करुन औषधोपचार करावा.